Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

Research Article

सर मॉर्टिमर व्हीलर यांचे भारतीय पुरातत्वातील योगदान

रविकिरण जाधव

विभाग प्रमुख, प्रा.भा.इतिहास व संस्कृती , दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर.

प्रास्तविक :-

सर मॉर्टीमर व्हीलर यांचे कार्य भारतीय पुरातत्वामध्ये चिरकाल स्मरणात राहील. भारतीय पुरातत्वामध्ये त्यांचे कार्याचे वैशिष्ट्य म्हणजे १) त्यांनी भारतीय पुरावतत्वाला आधुनिक तंत्र आणि पध्दतीची ओळख करुन दिली. २) प्रशिक्षित भारतीय पुरावत्वज्ञांची पिढी घडविली ३) पुरातत्वीय समस्यांचे निराकरण करण्यासाठी शिस्तबध्द नियोजन आणि उत्खननाच्या पध्दतीचा अवलंब केला. त्यांच्या शिस्तबध्द नियोजनामुळे भारतीय पुरातत्व संशोधनाला चांगली चांलना मिळाली आणि त्यामुळे विशेषत: दक्षिण आणि उत्तरेकडील प्राचीन भारतीय संस्कृतीचा कालक्रम ठरविण्याने खुप मदत झाली.

सर मॉर्टिमर व्हीलर त्यांचे वडिल एडिनबरा येथे पत्रकार म्हणून सुरुवातीला काम करीत होते. नंतर त्यांचे पुस्तकवाचनाची आवड विकसित केली. त्याचा त्यांना पुढील काळात खुप उपयोग झाला. लंडन विद्यापीठाची पदवी परीक्षा चांगला गुणांनीते उत्तीर्ण झाले. त्यामुळे त्यांना उच्च शिक्षणाकरीता लंडन विद्यापीठाची शिष्यवृत्ती मिळाली. याचकाळात त्यांनी रॉयल कलिज्ञन ऑन हिस्टॉरिकल मॉन्यूमेंटस लंडन या संस्थेत नोकरी केली. या संस्थेमध्ये रोमन इतिहासाचे संशोधन केले जात होते. पंरतू पहिले महायुध्द सुरु असल्यामुळे त्यांना सक्तीने लष्करामध्ये दाखल करण्यात आले. एक लष्करी अधिकारी म्हणून दुसऱ्या महायुध्दातही त्यांनी नॅशनल म्युझियम ऑफ वेल्स येथे व्यवस्थापक म्हणून कामास सुरुवात केली. नंतर या संग्रहालयाचे निदेशक म्हणून त्यांना पदोन्नती मिळाली. या काळात त्यांनी केवळ संग्रहालयाचा विकास केला असे नव्हे तर वेल्स येथील लोकांना पुरातत्वीय संशोधनाची ओळख करुन दिली त्याबरोबरच पुरातत्वीय संशोधनात उत्खन्नन करण्यासाठी नविन प्रयोग केले आणि यातूनच त्यांनी स्वत:चे वैशिष्टयपूर्ण तंत्र विकसित केले. व्हीलर यांनी कोणत्याही प्रकारे पुरातत्वीय प्रशिक्षण किंवा पदवी त्यापूर्वी घेतलेली नव्हती हे या संदर्भात उल्लेखनीय आहे. असे असूनही त्यांनी इंग्लड मध्ये आणि भारतामध्ये अनेक तरुणांना पुरातत्वीय संशोधनाचे प्रशिक्षण दिले. व्हीलर यांनी विद्यापीठ स्तरावर सर्वप्रथम लंडन विद्यापीठामध्ये पुरातत्व विभागाची स्थापना केली. मॉर्टिमर व्हीलर उत्खन्ननकाळात लष्करी शिस्त आणि नीटनेटकेपणा यांचे काटेकोरपणे पालन करुन घेत असत. प्रत्येक उत्खन्नन हे त्यांच्या दृष्टिने नविन शिक्षणच असे शिस्त आणि पुराव्यांची नोंदणी हे उत्खननाचे अविभाज्य भाग असत. स्तरशास्त्राच्या आधारे पुराव्याचे विश्लेषण करणे हे व्हीलर यांचे पुरातत्वाला महत्वपूर्ण योगदान आहे असे म्हणल्यास वावगे ठरणार नाही.

मॉर्टीमर व्हीलर भारतात येण्यापूर्वी १९२८ ते १९४४ भारतीय पुरातत्व खात्यामध्ये कोणत्याही सुधारणा झाल्या नव्हत्या. या काळात चार निदेशक भारतीय पुरातत्वाने व्हाईसरॉयकडे भारतीय पुरातत्वाच्या तत्कालीन स्थिती बद्दल अहवाल सादर करुन आणि त्यामध्ये भारतीय भारतात उत्खन्नन अशास्त्रीय पध्दतीने केले जाते. त्यामुळे महत्वपूर्ण पुरावे नष्ट होतात. याबद्दल टीका केली. तसेच भारतीय पुरातत्व खात्यातील कर्मचारी हे अप्रशिक्षित आहेत आणि

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

संख्या अक्षक्तेपेक्षा कमी आहे. यावर प्रकाश टाकला. या अहवालाची व्हॉईसरॉयने गंभीरपणे दखल घेतली आणि सर मॉर्टीमर व्हीलर यांची भारतीय पुरातत्व खात्याचे महानिदेशक म्हणून नेमणूक केली.

सर मॉर्टीमर व्हीलर यांची सुरुवातीपासूनच पुरातत्वाला शास्त्रीय बैठक प्राप्त करुन देण्याची इच्छा होती. त्यांनी विविध शास्त्रीय शाखांची मदत घेऊन पुरातत्वीय समस्या उत्खन्नन करणे, उत्खन्नन बेशिस्तपणा, पुराव्यांच्या नोंदी न करणे, उत्खननाचा अहवाल प्रसिध्द न करणे. या गोष्टी व्हीलर यांच्या दृष्टिने अतिशय तिरस्करणीय होत्या. पुरातत्वीय संशोधन शास्त्रीय पध्दतीनेच झाले. कारण शास्त्रांचा अभ्यास हा मानवाच्या विकासासाठी केला जातो. असे त्यांचे मत होते.

सर मॉर्टिमर व्हीलर यांनी ज्या ज्या ठिकाणी पुरातत्वीय संशोधन केले त्या त्या ठिकाणी त्यांनी आपल्या मुलभूत तत्वांचा अवलंब केल्याचे दिसते. ज्यावेळी त्यांची भारतीय पुरातत्व खात्याचे महानिदेशक म्हणून नियुक्ती झाली. त्यावेळी भारतीय पुरातत्वाची स्थिती अतिशय दयनीय होती.

सर मॉर्टिमर व्हीलर यांना भारतीय पुरातत्वाचे निदेशक म्हणून नियुक्तीचे निमंत्रण देण्यात आले. त्यावेळी ते दुसऱ्या महायुध्दात उत्तर अफ्रिकेमध्ये ब्रिटिशांच्या आठव्या आरमारमध्ये युध्द मोहिमेवर कार्यरत होते. मीट रिव्हर्स यांच्यानंतर एका लष्करी अधिकाऱ्यांची नेमणूक पुरातत्व खात्यावर झाली होती. पीट रिव्हर्स यांनी ६० वर्षापूर्वी ज्या गोष्टींचा अवलंब पुरातत्वासाठी केला होता. त्यांचा अवलंब व्हीलर यांनी भारतीय पुरातत्वामध्ये केल्याचे दिसते.

व्हीलर यांचे भारतातील कार्य : भारतीय पुरातत्व खात्याचे महानिदेशक म्हणून १९४४ ते १९४८ या चार वर्षाच्या करारावर त्यांची नियुक्ती करण्यात आली होती. या थोडयाशा कालावधीत मोठया प्रदेशामध्ये काम करण्याचे प्रचंड आव्हान त्यांच्या समोर होते. सुरुवातील भारतामध्ये उत्खननसाठी जागा निवडताना त्यांनी सावधगिरीने शोध केल्यास सुरुवात केली. त्यापूर्वी त्यांनी रोमन इतिहास व संस्कृती यावर बरेच काम केलेले होते. त्यामुळे त्यांनी भारतीय इतिहासाचा वेध घेताना रोमन आणि ग्रीक संस्कृतीचा कालक्रम आणि त्याचा भारतीय इतिहासाशी संदर्भ याचा अभ्यास केला. यातूनच त्यांनी सर्वप्रथम तक्षशिला येथे उत्खन्नन करण्याचा निर्णय घेतला. पूर्वी त्यांनी ग्रीक इतिहासाचा अभ्यास करुन अलेक्झांडरच्या जीवनावर 'The Untiring Alexandar' पुस्तक लिहिले होते. या पुस्तकातही भारताच्या वायव्य सरहद्द प्रातांचा उल्लेख आलेला होता. त्यामुळे तक्षशिला येथे उत्खन्नन करण्याचा निर्णय त्यांनी घेतल्याचे दिसते. तसेच त्यांनी भारतीय संशोधनकांना पुरातत्वाचे प्रशिक्षण देण्यासाठी तक्षशिला येथे प्रशिक्षण संस्थेची स्थापना केली.

व्हीलर यांनी प्रशिक्षीत केलेला तरुण संशोधकांबरोबर दक्षिण भारतातही प्राचीन स्थळांचा शोध घेतला. भारतातील त्यांच्या थोडयाशा कारकिर्दीमध्ये अरिकामेडू (पॉडेचरी) येथील उत्खननामध्ये मेडिटरेनियन मृदभांडी मिळाली ही गोष्ट त्यांना फार समाधान देवून गेली. या स्थळावर रोमन नाणी मिळतील म्हणून त्यांनी आणखी काही काळ या ठिकाणी शोध घेण्याचा प्रयत्न केला. चंद्रवस्ली (तामिळनाडू) या ठिकाणी त्यांना रोमणनाणी आणि मृदभांडी मिळावी.

दक्षिण कर्नाटकात ब्रम्हगिरी येथे मृदभांडी मिळाली त्यावरुन महापाषण संस्कृतीचा कालक्रम ठरविण्यास खुप मदत मिळाली.

सर मॉर्टीमर व्हील भारतात येण्यापूर्वी समीर सिंधू संस्कृतीचा शोध लागलेला होता. या बाबतीत तरी त्यांच्या समोर मोठे आव्हान होते. १९४४ मध्ये व्हीलर यांनी हडप्पा येथील उत्खनानाच्या अहवाल दोन खंडामध्ये प्रसिध्द केला होता. या अहवालाचा मॉर्टीमर व्हीलर यांनी अभ्यास करुन हडप्पा येथील स्थळाची तत्कालीन स्थिती चे निरीक्षण केले. १९४६ मध्ये मॉर्टीमर व्हीलर यांीन श्री.बी.बी. लाल, श्री. थापर आणि श्री. एच.के.बोस यांच्या सहकार्याने हडप्पा येथे तळ ठोकला. त्यावेळी ३० भारतीय विद्यार्थ्यांचा त्यामध्ये समावेश होता. येथील उत्खन्नाद्वारे त्यांनी काही नव्या बाबींकडे विद्वानाचे लक्ष वेधले. त्यांच्या येथील वास्तव्यात शेवटच्या वर्षी (१९४८) त्यांनी पाकिस्तानात पुरातत्वीय सल्लागार म्हणून अर्धवेळ (पार्टटाईम) काम पाहिले. या काळात त्यांनी मोहेजोदाडो येथे उत्खनन केले. त्यावेळी त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची समाधानकारक उकल होऊशकली नाही. सिंधू संस्कृतीचा स्थळाचे उत्खन्नन आणि संशोधन हे भारतीय पुरातत्वाच्या संदर्भात व्हीलर यांचे फार मोठे योगदान आहे.

सर मार्टिमर व्हीलर यांचा भारतीय पुरातत्वाला मिळालेला वारसा : भारतात येण्यापूर्वी व्हीलर यांनी अनेक तरुण संशोधकांना पुरातत्वाचे प्रशिक्षण दिले होते. भारतात आल्यावर त्यांनी ते कार्य पुढे चालू ठेवले आणि येथे अनेक भारतीय तरुणांना पुरातत्वीय प्रशिक्षण दिले.१९४४-४५ मध्ये तक्षशिला येथील प्रशिक्षण संस्थेत अनेक भारतीय तरुण

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

प्रशिक्षीत झाले. या काळात भारतातील सर्व भागातून विद्यार्थी त्यांच्याकडे शिकायला देत असत. सर्व्हे कसा करायचा, उत्खन्नाचे आयोजन कसे करायचे, अहवाल लिहिण्याची तयारी कशी करायची, याबाबतीत बहुमोल मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळत असे. तक्षशिला येथे प्रशिक्षीत झालेले अनेक विद्यार्थीनी दक्षिण भारतात अरिकामेडू येथील उत्खन्नात भाग घेतला. येथील अनुभवाच्या पुढील कारर्किर्दीत त्यांना खुप उपयोग झाला.

संदर्भात सापडणाऱ्या मृदूभांडयाचा पुराव्यानुसार सापेक्ष कालमापनाचे साधन उपलब्ध करुन दिले. त्यामुळे स्तर आणि मृदूभांडी यांच्या सहचर्याला महत्व प्राप्त झाले. त्यामुळे विविध वस्त्यांचे थर एकमेंकापेक्षा किती प्राचीन किंवा अकालीन आहेत हे त्या थरांशी संबंध असलेल्या इतर पुराव्यावरुन तौलनिक दृष्टया ठरविता येणे शक्य झाले.

१९४८ ला सर मॉर्टिमट व्हीलर भारतातून गेल्यानंतर त्यांनी स्वत: अंमलात आणलेली तत्वे नियम आजही पाळले जात आहेत. श्री. बी.के. थापर यांनी मास्को येथील ताम्रपाषाण युगीन स्थळावर व्हीलर यांनी घालून दिलेल्या नियमाप्रमाणे उत्खन्नन केले. थापर यांनी व्हीलर यांच्या तक्षशिला येथील प्रशिक्षण केंद्रात शिक्षण घेतले होते. डॉ.ह.धि.सांकलिया यांनी आपल्या ग्रंथामध्ये मॉर्टीमर व्हीलर यांच्या संशोधन पध्दतीमुळे भारतातील प्रागितिहास संस्कृतीचा कालक्रम ठरविणे शक्य झाला. व्हीलर यांची प्रशंसा केली आहे. १९५४-५५ मध्ये डॉ. सांकलिया यांनी नेवासा (अहमदनगर) येथील उत्खन्नात स्तरनिबध्द उत्खन्नन तंत्राचा अवलंब केला. त्यामुळे मध्य पुराध्यमयुगीन संस्कृतीची ओळख भारतामध्ये प्रथमच होऊ शकली.

व्हीलर यांनी पुरातत्व संशोधनाला, पूर्णपणे शास्त्रीय व अद्यावत स्वरुप देण्याची अद्वितीय कामगिरी करुन दाखविली. उत्खन्नात शास्त्रातील तज्ञांचे सहाय्य आणि सहकार्य घेऊन सर मॉर्टीमर यांनी भारतातील संशोधन कार्य यशस्वीपणे पार पाडले. उत्खन्ननशास्त्राच्या प्रगतीच्या दृष्टिने त्यांनी दोन काही महत्वाच्या गोष्टी केल्या. थराप्रमाणे उत्खनन करुन त्यातील अवशेषावरुन त्या थराचा काल ठरविण्याची पध्दती त्यांनी अंमलात आणली. थरांचे सूक्ष्म निरिक्षण करणे, थरातील वस्तू आणि नंतर खणलेला खडयातील वस्तू यांची सरमिसळ नाकरणे, टेकाडाचा खापरातील बदलांची सूक्ष्म नोंद करणे आणि त्यांच्याशी संलग्न असलेल्या पुराव्यावरुन त्यांचा काल ठरवणे, उत्खनित पुराव्याची उत्कृष्ट चित्रे आणि छायाचित्रे काढून घेणे, या सर्व बारीकसारीक पण महत्वाच्या गोष्टी त्यांनी उत्खन्नात सुरु केल्या. तक्षशिला, हडाप्पा, अरिकामेंडू व ब्रम्हगिरी येथील उत्खननाच्या कार्यक्रमाला शिस्त व वळण लागले. याशास्त्रीय व शिस्तबध्द निरिक्षणामुळेच त्यांना भारतीय संस्कृतीच्या विकासाचे आणि बदलाचे सर्व टप्पे उत्खनित अवशेषांवरुन ठरवता आले.

उत्खन्नन झाल्यावर प्रत्येक थरांना क्रमांक देणे, त्याचा आलेख काढणे, आणि प्रत्येक थरासाठी सर मॉर्टिमर व्हिलर यांनी चिन्हाची (Symbols) योजना केली. त्यामुळे थर कोणत्या प्रकारचे आहेत. याचा अभ्यास करणे शक्य झाले.

मौर्यकालीन, सातवाहन, रोमन, गुप्त आणि मुघलकालीन खापरांची वैशिष्टये अनेक ठिकाणी काळजीपूर्वक नोंदवून त्यांनी त्यावरुन थरांचा काल ठरविण्याची एक महत्वाची पध्दती निश्चित केली. अशा रितीने सर मॉर्टिमर व्हीलर यांनी भारतात पुरातत्व विद्येची व उत्खनन तंत्राची शास्त्र या दृष्टिने खरी प्रतिष्ठापना केली.

तक्षशिला प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रशिक्षीत झालेले अनेक भारतीय संशोधक सर मॉटिमटर व्हीलर यांच्यानंतर भारतीय पुरातत्वामध्ये महत्वपूर्ण संशोधन केले. महत्वाच्या पदावर कार्य केले. त्यापैकी काहीची नावे पुढीलप्रमाणे: डॉ. बॅनर्जी, डॉ.अजित मुखर्जी, प्रा.एस.आर. दास, एस.सी. चंद्रा, प्रा.बी.एन. पुरी, प्रभास मुजुमदार, बी.के. थापर, डॉ.डी.आर. पाटील, डॉ.कानोत, प्रा.अहमद हसन दानी.

संदर्भ :-

ग्रॅहम क्लार्क :- सर मार्टिमर व्हीलर ॲन्ड इंडियन ऑरकॉलॉजी लंडन,
शां.भा. देव :- पुरातत्वविद्या, महाराष्ट विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ,पुणे १९७६
ह.धी. सांकलिया :- प्रीहिस्टरी ॲन्ड प्रोटोहिस्टरी ऑफ इंडिया ॲन्ड पाकिस्तान

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

प्रमोद चक्रवर्ती :- इंडियन ऑरकॉलॉजी, न्यु दिल्ली.
म.के.ढवळीकर :- पुरातत्वविद्या, मुंबई